**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2017: 5.068, www.srjis.com***
*PEER REVIEWED JOURNAL, JUNE-JULY 2018, VOL- 6/28*

## तमाशा …… महाराष्ट्राची लोककला

**टाक रविशा धनराज**

*प्राचार्य, ग्रामोन्नती मंडळाचे शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नरायणगाव. ता. जुन्नर, जि. पुणे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

लोकांसाठी निर्माण केलेली कला म्हणजे लोककला होय. तमाशा ही महाराष्ट्राची लोककला आहे. लोकशाही या शब्दाच्या उदयानंतर लोकगीत, लोककला, लोकनाटय असे अनेक शब्द रूढ झाले. पण लोकसाहित्यातील तमाशा या प्रमुख कलाप्रकाराकडे जनमाणसांचा मोठया प्रमाणात कल आहे. महाराष्ट्राचे वैभव म्हणून तमाशाचा उल्लेख केला जातो. पूर्वीच्या काळी मनोरंजनाची साधने कमी होती . त्यामुळे ही 'रांगडी' गंमत पाहण्यासाठी तत्कालीन पुरूष मंडळीच्या उडया पडत असत. अशा या तमाशाची जडणघडण गोंधळ, जागरण यांसारख्या 'विधी' कल्पना वजा करून 'नाटय' तेवढे सादर केले जाऊ लागले. याच नाटयाला लोक तमाशा म्हणू लागले. अर्थात मनोरंजनाबरोबरच तमाशा समाजप्रबोधन करतो. सामाजिक प्रश्न हाताळतो. उदा. लेक वाचवा ,लेक शिकवा, हुंडाबळी, सामाजिक स्थिती, अर्थकारण, राजकारण, शेतकरी आत्महत्या इत्यादी असे अनेक प्रश्न तमाशाच्या माध्यमातून समाजासमोर मांडले जातात.

तमाशा हा मुळ अरबी शब्द आहे व त्याचा अर्थ प्रेक्षणिय दृश्य असा आहे. तमाशा हा शब्द अरबी असल्यामुळे मुसलमानांच्या प्रभावातून उगम पावला असावा असा काही विदवानांचा कयास आहे. तर नामदेव व्हटकर म्हणतात 'तमाशा हा मुळ पर्शीयन शब्द आहे'. तेथून तो उर्दु भाषेत आला व त्यानंतर मराठी भाषेत आला. यात त्यांनी तमाशाचा अर्थ मौजेचा आनंद देणारे किंवा आश्चर्यकारक दृश्य असा सांगितला आहे. तसेच तमाशा हा पेशवाईच्या काळात उदयाला आला असे काही विद्वानांचे म्हणणे आहे. याचबरोबर **1898** पर्यंत हा 'गंमत' नावाने ओळखला जात होता. त्यानंतर अण्णाभाऊ साठे यांनी तमाशाला 'लोकनाटय' असे नाव दिले.

गायन ,वादन ,नृत्य व नाटय यांनी युक्त असा लोकनाटयाचा अविष्कार म्हणजे तमाशा होय. शेतातील व इतर कष्टाची कामे करत असताना काम हलके वाटावे म्हणून स्वतःशीच म्हटलेली गाणी सणासुदीच्या वेळी आनंदाने सर्वजण एकत्र जमल्यावर उत्साहाने खेळलेले खेळ यातून लोककलेचा जन्म झाला आणि पुढे या लोककला एका पिढीकडून दुर्स या पिढीकडे उत्सर्जित झाल्या असे काही अभ्यासकांना वाटते

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

.अशा लोककला महाराष्ट्रात उगम पावल्या याचे अनेक पुरावे सापडतात.महाराष्ट्रात असलेल्या विविध लोककला प्रकारातून तमाशा हा उदयाला आलेला कलाप्रकार आहे.त्यात तमाशाने अनेक कलाप्रकारांतून प्रेरणा घेतली व स्वतंत्ररित्या उगम पावला असे जाणवते .याच तमाशाचा प्रत्यय महाराष्ट्रातील कानाकोर्प यात भरणारे बाजार ,यात्रा ,उत्सव यातून येतो.तमाशा हा कलाप्रकार कधी उदयाला आला हे सांगणे अवघड आहे मात्र तमाशा ही दलित उपेक्षित लोकांची कला आहे.

तमाशाचा जन्म होण्यापुर्वी मराठी लोकजीवनात लोकरंजनाची अनेकविध माध्यमे प्रचलित होती.नंदीवाले ,माकडवाले ,डोंबारी ,गारूडी ,बहुरूपी ,कळसुत्री बाहुल्यांचा खेळवाले ,कोल्हाटणी कळवातिणी आणि भगत व धर्मोपासक यांचे कलाविष्कार व यांसारखया काही सादरीकरणाचे गुण घेऊन तमाशा आकाराला आलेला दिसतो.तमाशाच्या जडणघडणीत गोंधळी , वाघ्या मुरळी, भारूड, जागरण , किर्तन, यांची सुदधा कला आलेली दिसते. तसेच महाराष्ट्रातील कलाप्रकार असलेली लेझीम ,झिम्मा, दांडपटयाचे खेळ, वासुदेव यातून तमाशा कलाप्रकाराचा उगम झालेला दिसतो.

तमाशा हा मनोरंजनाचा हुकमी एक्का विशेषतः ग्रामीण भागातील करमणुकीचे साधन म्हणून तमाशाकडे पाहीले जाते.या तमाशाच्या मंचाला तमाशाच्या भाषेत “बोर्ड” म्हणतात. तमाशाच्या एका खेळामध्ये गण॔ गौळण, लावणी, वग , छक्कड, फार्स, मुजरा ही तमाशाची अंगे आहेत.ते पुढीलप्रमाणे॔

**1. गण ः** गण म्हणजे गणपतीला केलेले आवाहन तमाशाचा खेळ निर्विघ्न पार पाडावा म्हणून तमाशाचा मालक आवाहन करतो व साथीदार चढया मोठया आवाजात धुपद आळवतात व सुरत्ये
धुपदाचा अंतीम सुर मोठयाने म्हणतात.

**2.गौळण ः** गणानंतर गौळणीचा सुरवात होते.गौळण म्हणजे गोपी आणि कृष्ण यांच्या लीलांविषयीची गीते. तमाशात गौळणींचे गायन होत नाही तर यात निरनिराळया रूपातील राधा व कृष्ण , गौळणी, त्यांचा मैत्रिणी ,पेंदया ,मावशीबाई या पात्रांच्या अभियानाला वाव असतो.

**3.लावणी ः** गण गौळणीनंतर लावणीचा कम असतो.लावणी हा तमाशातील अत्यंत वैष्टियपुर्ण असा प्रकार
आहे.तसेच लावणी हे तमाशाचे आकर्षण आहे. लावणीमध्ये सवालजवाब, रंगबाजी, बतावणी
डौलतज्यादा, कलगीतुरा, संगीतबारी यांचा समावेश असतो.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**4 . वग** ः वग म्हणजे गोष्ट किंवा कथानक असते . वग हा नाटकासारखा प्रत्यक्ष रंगमंचावर पात्रांकडून घडवून दाखवायचा असतो . त्यासाठी पात्रांना कल्पकबुदधी वापरून अनुरूप असे संवाद स्वयंस्फुर्तीने बोलायचे असतात . वगात सांगाडयाची महत्वाची भूमिका असते . कथानकात खेळकर वातावरण ठेवायचे काम सोंगाडया करत असतो .

**5 . छक्कड** ः छक्कड ही शृंगारप्रधान तसेच उपदेशपर असते . पदयमय संवादाच्या सादरीकरणाला छक्कड असे म्हणतात . त्याची परिणामकारकता अभिनयावर व म्हणण्याच्या शैलीवर अवलंबून असते .
तमाशातील हा एक लोकप्रिय प्रकार आहे .

**6 . फार्स** ः फार्स म्हणजे गंमत किंवा करमणूक किंवा विनोद . तसेच फार्स मध्ये विनोदाच्या माध्यमातून सामाजिक व्यंगदर्शन सादर केले जाते व त्यातून ज्ञान प्राप्त होते .

**7 . मुजरा** ः तमाशाच्या प्रायोगिक अंगाचा मुजरा हा महत्वपुर्ण भाग आहे . यात सर्व कलाकारांची नावे घेण्याची प्रथा आहे . तसेच त्यात कार्यक्रमाला हजर असलेल्या सर्व रसिक श्रोत्यांचे आभार
मानण्याची प्रथा आहे . साधारणतः मुजरा हा तमाशाच्या शेवटी सादर केला जातो .

अशी ही महाराष्ट्राची लोककला लावणीच्या ठसक्यावर आणि घुंगरांच्या बेधुंद करणाया तालावर प्रत्येक मराठी
मनाला गेली चार शतके डोलायला लावते आणि रंजन करते . त्यासाठी शाहीर नामजोशी , शाहीर पठ्ठेबापूराव ,दत्तोबा तांबे ,विठाबाई ते अगदी सुरेखा पुणेकर यांच्यापर्यंत अनेक तमाशा कलावंतांनी आपापल्या काळात या लोककलेला योगदान दिले .

**संदर्भ** ः

*देशमुखवि . , (2012) 'तमाशा पंढरी ' मैत्री प्रकाशन .*
*जाधव एस . , (1994) 'तमाशाचे अंतरंग' , सुलवा प्रकाशन .*
*कसबे , एम . , ( 2007 ) 'तमाशा कला आणि कलावंत ' , सुगावा प्रकाशन .*
*व्हटकर नामदेव . , (1975) 'मराठीचे लोकनाटय तमाशा कला आणि साहीत्य' , यशश्री प्रकाशन*
*www.Google.com / महाराष्ट्रातील तमाशा .*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*